**आकाशवाणी पुणे**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक – 30/06/2024** **वार – रविवार**

---

**पालख्यांचंआगमन**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री तुकाराम महाराज आणि संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्यांचे दोन दिवसांच्या मुक्कमासाठी आज पुण्यनगरी आगमन झालं आहे. संत तुकाराम महाराजांची पालखी जुन्या मुंबई पुणे रस्त्याने पुण्यात येत असून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी संगमवाडी येथील विसावा घेऊन पुण्यात येत आहे. या दोन्ही पालख्यांचा ज्या ठिकाणी संगम होतो त्या चौकात नागरिकांनी पालख्यांच्या दर्शनासाठी गर्दी केली आहे. या ठिकाणी पुणे महानगरपालिका आणि इतर सामाजिक संघटनांच्या वतीने पालख्यांचं स्वागत करण्यात येत आहे. पुणेकर भाविकांनी दर्शनासाठी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली आहे. दोन्ही पालख्या आता शिवाजीनगर इथून फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यामार्गे आपल्या मुक्कमाच्या ठिकाणी मार्गस्थ होत आहेत. तुकोबांची पालखी निवडुंगा विठ्ठल मंदिरात तर ज्ञानोबांची पालखीचा पालखी विठोबा मंदिर इथे मुक्कामी असणार आहेत.

**आरोग्यवारी**

राज्य महिला आयोगानं पुणे महानगरपालिकेच्या सहाय्याने महिला वारकऱ्यांसाठी आरोग्यवारी अभियान सुरू केलं आहे. पुण्यातील निवडुंगा विठोबा मंदिरात आज या उपक्रमाचं उद्घाटन झालं. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे आणि राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या माध्यमातून महिलांसाठी आरोग्य केंद्र, विसावा कक्ष, हिरकणी कक्ष उपलब्ध करून दिली जाणार आहेत, तसंच त्यांना सॅनिटरी नॅपकीन वाटप केले जातील.

पर्यावरण विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आणि महाराष्ट्र कला संस्कृती मंच यांनी आयोजित केलेल्या 'पर्यावरणाची वारी, पंढरीच्या दारी' या उपक्रमाचाही आज प्रारंभ झाला. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ.अविनाश ढाकणे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. वारकऱ्यांमध्ये पर्यावरण विषयक जागृतीसाठी गेल्या चौदा वर्षापासून हा उपक्रम सुरू आहे.

दरम्यान नागरिक आणि सामाजिक संस्थांच्या वतीने पालखी मार्गावर अन्नदान आणि इतर सेवा उपक्रमांचं वारकऱ्यांसाठी आयोजन करण्यात आले आहे. सिंबायोसिस विद्यापीठ रुग्णालय आणि संशोधन केंद्र, तसंच शीला राज साळवे मेमोरियल ट्रस्टनं पालखी सोहळ्यानिमित्त फिरता दवाखाना उपलब्ध करून दिला आहे.

**सर्वधर्मीयऐक्यदिंडी**

आषाढी वारीनिमित्त उद्या पुण्यात सर्व धर्मीय ऐक्य दिंडी आयोजित करण्यात आली आहे. मुस्लिम को-ऑपरेटिव्ह बँक, रिझवानी मस्जिद ट्रस्ट, सुफी वारकरी विचारमंच आणि साखळीपीर तालीम मारुती मंदिर यांनी हा उपक्रम आयोजित केला आहे.

**मनकीबात**

तीन महिन्यांच्या कालावधीनंतर; पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला.

केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी त्यांच्या कोथरूड इथल्या जनसंपर्क कार्यालयात नागरिकांसमवेत मन की बात कार्यक्रमाचं प्रसारण ऐकलं. पंतप्रधानांच्या या कार्यक्रमातून देशवासीयांना नेहमीच नवीन ऊर्जा आणि आत्मविश्वास मिळाला आहे, असं मोहोळ म्हणाले. माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यावेळी उपस्थित होते.

**मेट्रोस्थानक**

पुण्यातील काही मेट्रो स्थानकांची उभारणी चुकीच्या पद्धतीनं झाल्यानं परिसरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याचं आता मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठानं देखील मान्य केलं आहे. याप्रकरणी येत्या २ महिन्यात तोडगा काढण्याचे आदेश न्यायालयानं विभागीय आयुक्तांना दिले आहेत. या संदर्भातील याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती.

**ताम्हिणी**

पावसाळ्यातील संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी ताम्हिणी वन क्षेत्रात येत्या ३० सप्टेंबरपर्यंत पर्यटकांना प्रवेश बंदी करण्यात आली आहे. गेल्या आठवड्यातच या परिसरात एका धबधब्यात पडून दोन तरुणांचा मृत्यू झाला होता. अति पावसामुळं घाटातले रस्ते निसरडे होत असून वाहन चालकांनी काळजी घ्यावी असं आवाहन वन विभागानं केलं आहे.

**बाजारसमिती**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज विविध राज्यातून 90 ते 100 ट्रक फळ भाज्यांची आवक झाली. फळभाज्यांच्या भावतील तेजी अद्यापही टिकून आहे. तर पालेभाज्यांच्या भावांमध्ये घसरण दिसत आहे. फळ बाजारात कलिंगड, खरबूज या रसाळ फळांबरोबरच चिकूलाही मागणी वाढल्याने भाव वधारले आहेत. फुलबाजारात सर्वच फुलांच्या भावात घसरण झाली आहे.

**झिका**

पुण्यात मुंढवा भागातील आणखी एका रुग्णाला झिकाची लागण झाल्याचं निदान झालं आहे. या रुग्णाची प्रकृती ठीक असल्याचं महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ.राजेश दिघे यांनी सांगितलं. झिकाचा प्रसार रोखण्यासाठी महापालिका विविध उपाययोजना करत असून नागरिकांनीही डासांपासून संरक्षण होण्याच्या दृष्टीनं काळजी घ्यावी असं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

**विकसितभारत**

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त सनदी **ले**खापालांनी आणि विद्यार्थ्यांच्या 'विकासा' शाखेनं आज विकसित भारत दौडचं आयोजन केलं होतं. सारसबाग इथून सुरू झालेल्या या दौडमध्ये २००पेक्षा अधिक सीए सभासद, विद्यार्थी आणि त्यांचे कुटुंबीय सहभागी झाले होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज सकाळी पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. उद्याही हलक्या ते मध्यम पावसाचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**